REGISTERED No. B. 3434

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ | पुणें, बुधवार तारीख २० सप्टेंबर, १९५० | अंक ३८

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. १४८१ | " Cencobank " | नं. ५११ |

मुख्य कचेरी—लक्ष्मी रोड, पुणें शहर.
शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा, मंचर, भोर व पौड

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—
जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रबडे
मॅनेजिंग डायरेक्टर

## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी : भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर
शाखा—सांगली, शाहुपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

*—यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—*

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील सांगली, चेअरमन
श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा,
B. Com., C. A. I. I. B.
मॅनेजर

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,१८,२६५ |
| खेळतें भांडवल | रु. ७१,००,००० |

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.

**दळणाच्या चक्क्या–टूल ग्राइंडर्स**
**मशीन टूल्स**
**कडबा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.**
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
**केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

## विविध माहिती

**भारतांतील साखरेचे कारखाने**—कलकत्ता येथील इंडियन शुगर मिल्स असोसिएशननें भारतांतील साखरेच्या कारखान्यासंबंधीं एक पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. ह्या पुस्तिकेंत आज उभे असलेल्या कारखान्यांचीं नांवें तर दिलीं आहेतच परंतु चालू वर्षी उभारल्या जाणाऱ्या कारखान्यांचीही जंत्री दिली आहे. ह्या माहितीप्रमाणें, भारतांत साखरेचे व गुळाचे मिळून १६५ कारखाने आहेत. पाकिस्तानांत ८ साखरेचे कारखाने आहेत. ह्या कारखान्यांपैकीं १४६ कारखाने १९४९–५० सालीं चालू होते व २७ बंद होते.

**भारतांतील परकीय नागरिक**—१९४८ च्या प्रारंभीं भारतांतील परकीय लोकांची संख्या ३४,०२१ होती ती १९५० च्या प्रारंभीं ४५,६६१ झाली. ह्यापैकीं ३५,५५६ पुरुष आहेत. सर्वांत अधिक संख्या चिनी लोकांची आहे. भारतांत सुमारें १३,५३९ चिनी लोक आहेत, ३३२ रशियन्स आहेत, ४,१५७ अमेरिकन्स आहेत. बल्गेरिअन्स आणि कोलंबिअन्स प्रत्येकी २ आहेत.

**अमेरिकेंत युद्धाची भीति**—अमेरिकेंत कांहीं लोक तरी जागतिक युद्धाच्या भीतीनें व्यग्र होऊन अन्नधान्यादि वस्तूंचा सांठा करूं लागले आहेत. कॅलिफोर्नियांतील एका व्यापाऱ्यानें आपल्या रहात्या घराखालीं एक भुयार बांधलें आहे. हें भुयार रेडियमच्या किरणापासून अबाधित राहील अशी व्यवस्था करण्यांत आली आहे. वॉशिंग्टन येथील वृत्तपत्रांत "घर विकणें आहे. इतर घरांपेक्षां बॉम्बपासून अधिक सुरक्षित" अशा जाहिराती येऊं लागल्या आहेत.

**डेनमार्क सीलोनकडून चहा घेणार**—सीलोनकडून चहा आणि रबर विकत घेण्याच्या वाटाघाटी सध्या डेनमार्क करीत आहे. मधला दलाल न ठेवता प्रत्यक्ष सीलोनकडूनच हा माल घेण्याचा डेन्मार्कचा हा पहिलाच प्रयत्न आहे. ह्यापूर्वी डेन्मार्क आपल्याला लागणारा चहा आणि रबर लंडनच्या बाजारांत घेत असे. सीलोनशीं प्रत्यक्ष संबंध जोडल्यामुळें माल स्वस्त मिळेल असा डेन्मार्कचा अंदाज आहे.

**प्रयोगशाळा भस्मसात झाली**—एणार्कुलम् येथील टाटा ऑईल मिल्सला आग लागून तेथील प्रयोगशाळा आणि ग्रंथालय हीं पूर्णपणें जळून गेलीं. सर्व मिळून कांहीं लाख रुपयांचें नुकसान झालें आहे.

**मिरचीच्या आयातीवरील बंदी**—भारतामधून सीलोनकडे निर्गत होणाऱ्या मिरच्यांवर सीलोन सरकारनें बंदी घातली होती. ही बंदी आतां उठविण्यांत आली आहे.

**निर्वासितहि डॉलर्स मिळवूं शकतात**—भारतांत आलेल्या निर्वासित स्त्रिया निरनिराळया प्रकारच्या हस्तव्यवसायांत गुंतलेल्या आहेत. त्यांनीं तयार केलेल्या कांहीं वस्तू भारताच्या परदेशीय वकिलातींकडे धाडण्यांत आल्या होत्या. वकिलातीतर्फे आता ४,११० डॉलर्स किंमतीच्या मालाच्या मागण्या आल्या आहेत. ऑगस्ट अखेर ह्या स्त्रियांनीं केलेल्या ३४,००० रु. किंमतीच्या वस्तू परदेशीं विकण्यांत आल्या.

**ऑस्ट्रेलियांत युरेनिअम सांपडलें**—ऑस्ट्रेलियाच्या उत्तर भागांत डारविनच्या दक्षिणेस २०० मैलांवर, फर्ग्युसन नदीच्या काठीं युरेनिअम धातु असणारी माती मोठ्या प्रमाणावर सांपडली आहे. ही जागा आतां सरकारनें ताब्यांत घेतली आहे. युरेनिअम सांपडूं शकणारी ऑस्ट्रेलिआंतील ही दुसरी जागा आहे.

**बिहारची घरें बांधण्याची योजना**—औद्योगिक शहरांतील घरें बांधण्याच्या योजनेसाठीं बिहार सरकारनें चालू वर्षाच्या अंदाजपत्रकांत १०,००,००० रुपये मंजूर केले आहेत. भारत सरकारनेंही आपल्या हिश्शाचा १०,००,००० रुपये खर्च देण्याचें कबूल केलें आहे.

**इटलीची लोकसंख्या**—चालू वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांत इटलीची लोकसंख्या २॥ लाखांनीं वाढली असल्याचें समजतें. इटलीची लोकसंख्या आणि उत्पादन ह्यांच्यांत फार तफावत असल्यानें लाखो इटालिअन नागरिक द. अमेरिकेंत जाण्याची खटपट नेहमींच करीत असतात.

**ग्रामपंचायतीचे चिटणीस**—लहान लहान खेडेगांवांतील ग्रामपंचायतींच्या चिटणीसांना खेड्यांतील पोस्ट मास्तरचें काम करण्याची परवानगी देण्यांत आली आहे. चिटणीस म्हणून पडणाऱ्या कामांत कोणत्याही प्रकारें व्यत्यय येत नसेल तर ग्रामपंचायत असें काम करण्याची सवलत चिटणीसांना देऊं शकते

**एअर इंडिया लि.**—वरील कंपनीजवळ १५ डकोटा,७ व्हायकिंग्ज व १ बीचक्रॅफ्ट डी. १८ S अशी २३ विमानें आहेत आणि तीं मुंबई-अहमदाबाद-कराची, मुंबई-कराची, मुंबई-मद्रास-कोलंबो-मुंबई-मद्रास, मुंबई-अहमदाबाद-जयपूर-दिल्ली, मुंबई-दिल्ली, मुंबई-कलकत्ता, मुंबई-बंगलोर-कोइमतूर-कोचीन-त्रिवेंद्रम अशीं वहातुक करतात. १९४९ मध्यें कंपनीला भाड्याचें १,८७,३७,२२८ रु. उत्पन्न झालें आणि खर्च वजा जाता, पुरेसा घसारा न काढूनहि, २७,६०५ रु. नफा उरला.

**बँक अधिकाऱ्यांचें लंडनमध्यें शिक्षण**—बँक ऑफ इंडिया लि. नें, आपले चार अधिकारी लंडन येथें परराष्ट्रीय हुंडणावळीचें खास शिक्षण घेण्यासाठीं पाठविले आहेत. हे चौघे गेल्या शनिवारीं आगबोटीनें रवाना झाले. त्यांचीं नांवें एस. सी. कोठारी, पी. व्ही. हिरानंदानी, डी. एन. करंजिया आणि व्हो. एम. नाडकर्णी अशीं आहेत.

**वेस्टर्न इंडिया थिएटर्स लि.**—वरील कंपनीस ३१ मार्च १९५० अखेर संपलेल्या वर्षी ९,४१,५११ रु. नफा झाला. डिव्हिडंडचा दर ३ रु. चा ५ रु. करण्यांत आला आहे.

**मळ्यांतील अधिकाऱ्यांचें सिलोनीकरण**—ह्यापुढें युरोपियनांची सुपरिंटेंडेंट किंवा असिस्टंट सुपरिंटेंडेंट म्हणून नेमणूक करू नका, अशी सूचना सीलोन सरकारनें तेथील मळेवाल्यांना केली आहे.

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—
**खादी मन्दिर**
२६१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. २० सप्टेंबर, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## जागतिक बँक आणि मागासलेले देश

इंटर नॅशनल बँक औद्योगिक व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या देशांना पुरेशी मदत करीत नाहीं, अशी त्या देशांची तक्रार आहे. प्रत्यक्ष श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांनींच बँकेच्या वार्षिक सभेंतील आपल्या अध्यक्षीय भाषणांत बँकेवरील ह्या जबाबदारीचें दिग्दर्शन केलें होतें. मागासलेल्या देशांना इंटरनॅशनल बँकेकडून मोठें सहाय्य मिळून त्यांची स्थिति सुधारण्यास भरपूर मदत मिळण्याची आज तरी फारशी आशा वाटत नाहीं. जून १९५० अखेरपर्यंत बँकेनें एकूण ८३ कोटी डॉलर्सची कर्जे दिलीं, त्यापैकीं ४९ कोटी डॉलर्सचीं कर्जे फ्रान्स, नेदरलंड्स, डेनमार्क आणि लक्सेंबर्ग यांच्या वाट्यास आलीं. मे ते ऑगस्ट, १९४७ ह्या चार महिन्यांच्या अवधींतच हीं कर्जे दिलीं गेलीं. गेल्या वर्षीच्या कर्जांचा तपशील पाहिला, तर त्यांतील बहुतेक कर्जे दक्षिण अमेरिका खंडांतील देशांनाच मिळालीं आहेत. आशिया खंडांतील दोन देशांना कर्ज मिळण्याचें भाग्य लाभलें आहे. ते देश म्हणजे भारत आणि इराक हे होत. भारताला १,८५,००,००० डॉलर्सचें कर्ज मंजूर झाल्याचें मागेंच प्रसिद्ध झालें आहे. परंतु इतर कित्येक देशांच्या कर्जाचे अर्ज अद्याप विचार व चौकशी ह्या सदरांतच पडून आहेत. मागासलेल्या देशांकडे बँकेनें दुर्लक्ष केल्यास त्याचे दुष्परिणाम कसे घोर होतील, हें श्री. देशमुख ह्यांनीं बँकेच्या गव्हर्नरांचे बैठकींत स्पष्ट करून सांगितलें. "वेळ गमावून भागणार नाहीं. पुनर्घटनेचें काम तात्काळ पुरें होण्याजोगें नाहीं, हें उघड आहे. परंतु, ज्या देशांची अर्थव्यवस्था आपण सुधारण्याचा प्रयत्न करणार आहोंत, ती अर्थव्यवस्था दिरंगाईमुळें आणखी खालावणार नाहींना, हें आपण नीट पाहिलें पाहिजे." आशियांतील मागासलेले देश अद्याप युद्धजन्य दुरावस्थेंतून बाहेर पडूं शकलेले नाहींत आणि त्यामुळें त्यांत अनेक नवे प्रश्न निर्माण होऊं लागले आहेत. पुढारलेल्या राष्ट्रांनीं युरोपच्या पुनर्घटनेकडे जसें लक्ष पुरविलें आणि मार्शल योजनेच्या उपायानें तेथील देशांची घडी नीट बसवून देऊन त्यांचें उत्पादन सुधारलें, तसें लक्ष आशियांतील देशांकडे दिलें जात नाहीं ह्यांतील मर्म स्पष्ट आहे. इंटरनॅशनल बँकेचें काम खऱ्या अर्थानें यशस्वी व्हावयाचें असल्यास, तिनें मागासलेल्या देशांच्या उद्धाराकडे तत्परतेनें लक्ष पुरविलें पाहिजे.

बँकेच्या वार्षिक अहवालांत, बँकेचें कर्जविषयक धोरण स्पष्ट करण्यांत आलें आहे. ज्या योजनांसाठीं कर्ज द्यावयाचें, त्यांची निवड त्यांच्या नफा मिळविण्याच्या पात्रतेवर केवळ अवलंबून ठेवणें इष्ट नाहीं. वहातुक, घरें, जमीनसुधारणा, कालवे, इत्यादींत अगोदर जेव्हां पैसे गुंतवावेत, तेव्हांच उत्पादक कार्यक्रम हातीं घेतां येतो, असाच बहुधा अनुभव येतो. योजनांचा सर्व खर्च बँकेच्या कर्जांतून न भागविता, कर्जदार देशानेंहि त्याचा कांहीं वाटा उचलला पाहिजे असा बँकेचा आग्रह असतो. बँक आपला व्याजाचा दर शक्य तो कमी करीत आणीत आहे. बहुतेक कर्जे सरकारांना दिलेलीं आहेत; खासगी उपक्रमांना नाहींत. जो धोका पत्करण्यास खासगी भांडवल पुढें येऊं शकत नाहीं असा धोका पत्करणें हें बँकेचें कामच आहे. पैसे गुंतवितांना बँकेनें कसून चौकशी व तपासणी करणें हें ओघानेंच येतें. मागासलेल्या देशांना बँकेच्या तपासणीस उतरणें कठीण होतें, त्याबरोबरच पुढारलेल्या देशांकडून मदत मिळण्याचा त्यांचा एक प्रकारचा हक्कच आहे, असेंहि त्यांना वाटतें. मागासलेल्या देशांच्या बाबतींत बँकेनें फार काटेकोरपणा दाखविला, तर बँकेची उपयुक्तता त्यांना वाटणार नाहीं. पत आणि परतफेड ह्यांवर बँकेनें भर दिला, तर मागासलेल्या देशांना बँकेवर अवलंबून रहाण्याजोगी परिस्थिति उरणार नाहीं. त्यांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक सहाय्य लागेल, तें बँक देऊं शकत नसेल तर दुसरी कोणती तरी योजना आवश्यक होईल. परंतु, त्यांना स्वतःच्या सामर्थ्यानें स्वतःचा उद्धार घडवून आणण्यास लागणारी सवड मिळण्याची आज मुळींच खात्री नाहीं. व्यापक दृष्टीनेंच ह्या प्रश्नाकडे पाहिलें पाहिजे.

इंटर नॅशनल बँकेच्या वार्षिक अहवालांत भारतांतील आर्थिक परिस्थितीचा आढावा घेतलेला आहे. भारताची परराष्ट्रीय येण्या-देण्याची परिस्थिति सुधारली आहे, चलनवाढ मर्यादेबाहेर जाऊं दिलेलें नाहीं आणि देशांतील आर्थिक स्थिति बिघडूं देण्यांत आलेली नाहीं, असें आढाव्यांत म्हटलें आहे. भारतीय सरकारचीं अंदाजपत्रकें जोवर तुटीचीं आहेत, अन्नधान्याचा तुटवडा कमी होत नाहीं आणि आवश्यक जिनसांच्या आयातीस बळेंच बंदी घालावी लागते, तोपर्यंत चलनवाढ आणि महागाई ह्यांची आपत्ति दूर झाली असें म्हणतां येणार नाहीं, असा बँकेनें इषारा दिला आहे. लष्करी खर्चाचा हिंदी आर्थिक परिस्थितीवर ताण पडत आहे हें बँकेचें विधान खरें असलं तरी प्रत्यक्ष स्वातंत्र्यरक्षणासच तो खर्च आवश्यक असेल तर तो टाळणें योग्य होणार नाहीं, हें उघड आहे. पाकिस्तान व भारत ह्यांतील व्यापाराची कोंडी फोडण्याचें महत्त्व बँकेनें प्रतिपादन केलें आहे, परंतु पाकिस्तानी चलनाची किंमत ठरविण्याचा प्रश्न मात्र इं. मो. फंडानें पुढें ढकलला आहे. इं. बँकेनें ज्या प्रश्नास महत्त्व दिलें आहे, तोच प्रश्न इं. मो. फंडानें हातीं घेण्यांत केलेल्या दिरंगाई-बद्दल श्री. देशमुख ह्यांनीं निराशा व नापसंती व्यक्त केली आहे.

---

### प्रो. लास्कींचें मृत्युपत्रः पत्नीस सर्वाधिकार

प्रो. हॅरोल्ड जे. लास्की, ह्यांनीं आपल्या मागें मिसेस लास्की ह्यांस १९,५५८ पौंड ठेवले आहेत. मिसेस लास्कींना ह्या मालमत्तेचा त्यांच्या पश्चात् कसाहि विनियोग करतां येईल. प्रोफेसर साहेबांचीं कांहीं पुस्तकें मिसेस लास्की ह्या लंडन स्कूल ऑफ एकॉनॉमिक्स व लेडी मार्गारेट हॉल, ऑक्सफर्ड, ह्यांना देतील अशी आशा त्यांनीं आपल्या मृत्युपत्रांत व्यक्त केली आहे. आपल्या कांहीं मित्रांनाहि मैत्रीची खूण म्हणून एक एक पुस्तक दिलें जावें, अशीहि त्यांची इच्छा आहे.

---

## ब्रिटन व पाकिस्तान यांचे व्यापारी संबंध

(मा. म का.)

लॉर्ड बर्गले यानीं इंग्लंड व पाकिस्तान यांच्या दरम्यान औद्योगिक व व्यापारी संबंध कसे असावे याबद्दल सादर केलेल्या अहवालाबद्दल ब्रिटिश वृत्तपत्रांतून पुढील आशयाचे विचार व्यक्त केलेले दिसत आहेत. पाकिस्तानच्या आयात व्यापाराचा ४० टक्के भाग ब्रिटनकडून येतो, परंतु पाकिस्तान मात्र साधारणपणें २५ टक्के भागच ब्रिटनकडे निर्गत करते. सध्यां पाकची मुख्य मागणी भांडवली मालाबद्दलचीच असली तरी इतर प्रकारच्या उपभोग्य मालाबद्दल पाकिस्तानची मागणी पुढील काळांत वाढत जाईल अशी एक कल्पना आहे. पूर्वेकडील व्यापारांत जपानची स्पर्धा हल्लीं सुरू झाली आहे व त्याचा परिणाम ब्रिटनकडून होणाऱ्या निर्गतीला सहन करावा लागेल. १९४८ व १९४९ या दोन वर्षांत ब्रिटनकडून पाकिस्तानकडे कापडाची निर्गत जरा मोठ्या प्रमाणांत झाली, परंतु या निर्गतीलाहि आतां जपानकडून होणाऱ्या जाड्याभरड्या कापडाशीं स्पर्धा करावी लागत असून, स्वस्त व जाड जपानी कापड पाकिस्तानांत जास्त प्रमाणांत विकलें जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे असा अनुभव १९५० सालीं आला आहे. ब्रिटिश कापड पाकिस्तानांत खपावयाचें असल्यास त्याची किंमत शक्य तितकी कमी पातळींत राखली गेली पाहिजे असें मत आहे. ब्रिटनचें लक्ष आज विशेषतः युद्धविषयक तयारी करण्याच्या प्रश्नाकडे वेधलेलें असल्यामुळें ब्रिटनच्या उत्पादनाच्या कार्यक्रमाला आतां थोडेंसें निराळें वळण लागणें संभवनीय दिसतें व त्यामुळें कदाचित ब्रिटन मागणीप्रमाणें पाकिस्तानला विक्री माल योग्य वेळांत पुरवू शकणार नाहीं. पाकिस्ताननेंहि आपले स्वतःचे व्यापारी संबंध कायम ठेवावयाचे असल्यास मालाच्या किंमती कमी केल्या पाहिजेत व ही गोष्ट पाकिस्ताननें आपल्या रुपयाची किंमत उतरविण्यावर अवलंबून राहाणार आहे. प्रत्यक्ष पाकिस्तानची आर्थिक परिस्थिति त्या देशाचे हिंदशीं असलेले व्यापारी संबंध सलोख्याचे राहण्यावर अवलंबून राहील. ब्रिटनमध्यें असेंहि मत व्यक्त केलें जात आहे कीं ब्रिटिश मालाच्या किंमती जास्त आहेत अशी तक्रार पाकिस्ताननें करण्याचें कारण नाहीं, कारण पाकिस्ताननें रुपयाची किंमत उतरविली नसल्यामुळें त्या देशाला ब्रिटनकडून किंमतीच्या बाबतींत योग्य तो फायदा मिळत आहेच. ब्रिटिश कापडाचा दर्जा हा साधारणपणें पाकिस्तानी गिऱ्हाइकाला पसंत पडेल असा नसतो तर उलट जपानी कापड दर्जाच्या दृष्टीनें पाकिस्तानच्या लोकांना स्वीकारणीय वाटतें. ब्रिटनमध्यें असेंहि एक मत व्यक्त केलें जात आहे कीं लँकेशायरच्या कापडाच्या गिरण्यांच्या यंत्रसामुग्रीच्या कारखान्यांनीं यापुढें पाककडे यंत्रें इ. पाठविण्यावर जास्त भर दिला पाहिजे, व या बाबतींत पाकमध्यें पिकणारा अमेरिकन जातीचा कापूस ब्रिटनला खरेदी करतां येऊन सोइस्कर परिस्थिति निर्माण होईल. पाकच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टीनें ही गोष्ट महत्त्वाची आहे. इंजिनियरिंग, रासायनिक व शेतीची परिस्थिति बरीच अनुकूल आहे.

---

### लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाची शेती–जंगल व्याख्यानमाला.

ह्या व्याख्यानमालेंतील पहिलें व्याख्यान दि. १६ सप्टेंबर रोजीं श्री. एम्. पी. पाटील, मुंबई राज्याचे कृषि–मंत्री, यांचें झालें. व्याख्यानाचा विषय "मुंबई राज्यांतील शेती" असा होता. यानंतर या मालेंत मुंबई राज्यांतील शेती व जंगल खात्यांतील तज्ज्ञांचीं व अधिकाऱ्यांचीं व्याख्यानें क्रमशः होणार आहेत.

### कराड अर्बन को. बँक लि.

अहवालाचे वर्षीहि बँकेची सर्वांगीण प्रगति झाली आहे. भाग भांडवल, खेळतें भांडवल, गंगाजळी, इन्व्हेस्टमेंट, इतर निधि, ह्या सर्वांत वाढ असून व्यवस्था खर्च उतरला आहे. नफा वाढला आहे. गुदाम इमारत निधीमध्यें आता १० हजार रु. रकम होईल. बँकेनें नियंत्रित भावाचीं कापड व इतर रासन दुकानें कार्यक्षमतेनें चालविलीं, स्वातंत्र्यदिन साजरा केला, सहकारी सप्ताह पाळला, सातारा जिल्ह्यांतील अर्बन बँकांच्या संचालकांचें संमेलन भरवलें. सहकारी तत्त्व आणि त्याचा व्यवहारांत आचार ह्या दृष्टीनें पहातां कराड अर्बन बँकेच्या कारभारास अत्यंत उच्च अनुक्रम मिळत आहे. श्री. पु. पां. गोखले ह्यांच्या कळकळीच्या व ध्येयनिष्ठ मार्गदर्शनाचा बँकेच्या प्रगतीस चांगलाच उपयोग होत आहे. (चेअरमन: पु. पां. गोखले. मॅनेजर व मॅनेजिंग डॉयरेक्टर: शं. पु. कुलकर्णी)

---

### भुसावळ पीपल्स को. बँक लि.

१,२४,९२५ रु. शेअर भांडवल, १,७१,६८६ रु. रिझर्व्ह फंड, १८,८२,१६४ रु. ठेवी इत्यादि बाबी कर्जाचे बाजूस असून जिंदगीचे बाजूस ४,४८,००२ रु. रोख व बँकांत, ७,४४,६४५ रु. एनव्हेस्टमेंट, ९,४९,३२६ रु. कर्जे असे प्रमुख आकडे आहेत. बँकेचें संशयित व बुडीत कर्ज अदमासें ८३६ रु. असून त्याच्या तरतुदीच्या फंडांत ७,८८३ रु. आहेत. थकबाकीचें प्रमाण फक्त ०.५२% इतकेंच आहे कर्जापोटीं गुंतवलेली रक्कम एकंदर भांडवलाच्या ४५% पेक्षा अधिक नाहीं. भुसावळ अर्बन बँकेचा दर्जा अत्यंत वरच्या दर्जाचा असून तिची मजबुती वगैरे अनुकरणीय आहे. चालू वर्षी बँकेची ज्युबिली साजरी होणार आहे. त्या प्रीत्यर्थ ७,००० रु. खर्च करण्यांत येईल. (चेअरमन: हरी सदाशिव खरे. मॅनेजर: जिनाभाई जी. देसाई, एफ. आय. एस. ए.)

---

### पूना अर्बन को. बँक लि.

वरील बँकेच्या सभासदांची संख्या १०५३ असून त्यांनीं ४५,९७१ रु. चे शेअर्स घेतलेले आहेत. वेगवेगळ्या फंडांत सुमारें १७ हजार रु. आहेत. कर्ज व ठेवी ह्यांचा आकडा १,६०,८३४ रु. आहे. बँकेनें एकूण १,५८,७३५ रु. चीं कर्जें दिलेलीं आहेत. सोनें तारणावर कर्ज देण्यास प्रारंभ केला आहे. अहवालाचे वर्षी बँकेस निव्वळ नफा २,८४० रु. झाला आहे. ३½% डिव्हिडंडला १,३९६ रु. लागतील. (चेअरमन: मो. न. पाटसकर. सेक्रेटरी: पां वि. इनानदार)

---

### मुंबई प्रां. सहकारी लँड मॉर्गेज बँक लि.

सहकारी गृह मंडळयांना कर्जे देण्यास वरील बँकेनें प्रारंभ केला आहे. अहवाळाचे वर्षी तिनें ५,५२,००० रु. चीं अशीं ५ कर्जें दिलीं. प्राथमिक लँड मॉर्गेज बँका व व्यक्ती ह्यांना शेतीविषयक ८,८६,५५६ रु. चीं ३९१ कर्जें दिलीं गेलीं. प्राथमिक बँकांच्या कार्यक्षेत्राबाहेरील व विलीन संस्थानांतील शेतकऱ्यांना कर्जें देण्यास बँकेनें प्रारंभ केला असल्यानें बँकेचा व्यवहार वाढत जाण्याचा रंग दिसतो. मात्र कर्जासाठीं पुरेसा पैसा आणि नोकरवर्ग सरकारकडून मिळणें जरूर आहे.

---

### साउथ सातारा डि. सें. को. बँक लि.

साउथ सातारा डि. सें. को. बँकेच्या, म्हणजे पूर्वीच्या सांगली स्टेट सेंट्रल को. बँकेच्या मिरज शाखेचें उद्घाटन शुक्रवार दि. १५ सप्टेंबर रोजीं सहकारी रजिस्ट्रार श्री. पां. ज. चिन्मुळगुंद आय. सी. एस. ह्यांच्या हस्तें झालें. शाखेचा पत्ता गाडवे बिल्डिंग, टाऊन हॉल नजीक, मिरज, असा आहे.

## लंडन येथें भरणारी कामनवेल्थ परिषद्

सप्टेंबरच्या ६ तारखेला लंडन शहरांत भरणाऱ्या कामनवेल्थ परिषदेंत दक्षिण व आग्नेय आशिया खंडांतील निरनिराळ्या प्रमुख राष्ट्रकुटुंबांतील देशांनीं, चर्चेसाठीं आपल्या विकासयोजना तयार केल्या आहेत. या योजनांवरून असें दिसतें कीं, कोलंबो येथें जानेवारी महिन्यांत झालेल्या परिषदेच्या वेळेपासून विकास योजनांची कल्पना निश्चित करण्याबद्दल प्रगति झाली आहे. गेल्या मे महिन्यांत सिडने येथें ब्रिटिश राष्ट्रकुटुंबांतील राष्ट्रांची परिषद् भरली होती. त्या परिषदेनें तांत्रिक मदत निरनिराळ्या देशांना देण्यासाठीं एक मंडळ स्थापन करण्याचें ठरविलें. हें मंडळ ब्रिटिश राष्ट्रकुटुंबांतील प्रमुख तज्ज्ञ संस्थांचे बनविलें जावें असें ठरविलें होतें व त्याप्रमाणें या मंडळाची घटना निश्चित करण्यांत आली आहे. राष्ट्रकुटुंबांतील देशांनी या मंडळासाठीं आठ दशलक्ष पौंडाचा निधि उभारण्याचें ठरविलें असून त्यापैकीं ३५ टक्के निधि खुद्द इंग्लंडनें उभारण्याचें कबूल केलें आहे. सिडने परिषदेमध्यें एक सहा वर्षांच्या मुदतीची विकास-योजना तयार करण्यांत यावी असें ठरलें होतें. त्याप्रमाणें निरनिराळ्या देशांनीं आपल्या विकास योजना तयार केल्या आहेत. राष्ट्रकुटुंबांतील देशांनीं एवढ्या अल्पावधींत स्वतःच्या विकासयोजना तयार कराव्या ही गोष्ट शुभ समजली जात आहे. ब्रह्मदेश, थायलंड व इंडोनेशिया या राष्ट्रकुटुंबांत न येणाऱ्या देशांनाहि विकास योजना तयार करावयास विनंती करण्यांत आली होती व ती विनंति त्यांनीं ही पूर्णपणें मान्य केली नसली तरी या दृष्टीनें त्यांनी थोडीबहुत तयारी केली आहे.

राष्ट्रकुटुंबांतील देशांना स्वतःच्या विकासयोजना तयार करतांना आशिया व अतिपूर्वेकडील देशांच्या पहाणीसाठीं नेमण्यांत आलेल्या कमिशनच्या अहवालाचा कांहींसा उपयोग झाला आहे. हा उपयोग मात्र सामान्य धोरण ठरविण्याच्या दृष्टीनें झाला असावा. हिंद सरकारनेंहि लंडन परिषदेपुढें मांडण्यासाठीं आपली स्वतःची १८०० कोटी रु. ची सहा वर्षांची विकास योजना तयार केली आहे. सामान्यपणें या विकास योजनांत मुख्य प्रश्न पैशाचा आहे. पैसा पुढील तीन प्रकारांनीं उभारण्यांत यावा असें दिसतें. पहिला प्रकार म्हणजे प्रत्येक देशानें स्वतःसाठीं आपल्या शिलकींतून व खुल्या बाजारांत कर्ज उभारून उभारावें. दुसरा मार्ग म्हणजे राष्ट्रकुटुंबांतील देशांकडून कर्ज उभारावा व तिसरा मार्ग म्हणजे आंतरराष्ट्रीय बँकेकडून व शक्य तर अमेरिकेच्या सहाय्यानें कांहीं कर्ज उभारावें. विकास योजनांची अंमलबजावणी कशी करावयाची हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे व त्या बाबतींत असें कदाचित् ठरेल कीं अमेरिका मदत द्यावयास तयार झाल्यास प्रत्येक देशानें अमेरिकेशीं स्वतंत्र करार करावा. तांत्रिक मदत देण्याच्या योजनेची मुख्य बाजू अशी आहे कीं देशांतील लोकांनीं इतरांच्या म्हणजे परकी तज्ज्ञांच्या मदतीनें आपापल्या स्वतःच्या देशांतच तांत्रिक शिक्षण देण्याचा प्रयत्न करावा, कारण असें करणें कमी खर्चाचें ठरेल. निरनिराळ्या देशांच्या विकास योजनांत वैयक्तिक भेद नसतील तर लंडन परिषदेंतून एकमुखी निर्णय बाहेर पडेल, व हा निर्णय सप्टेंबर अखेर भरणाऱ्या मंत्र्यांच्या सभेपुढें मांडला जाईल.

---

### ब्रह्मदेशाकडून येणें हप्ता देण्याची तरतूद नाहीं

भारत सरकारच्या देण्याच्या परत फेडीची तरतूद ब्रह्मी सरकारच्या १९५०-५१ च्या अंदाजपत्रकांत करण्यांत आलेली नाहीं.

### बोनस हा मजुरी वाढविण्याचा मार्ग नव्हे

"घसारा, रिझर्व्ह व कर ह्यांची तरतूद केल्यानंतर शेअर होल्डरांच्या डिव्हिडंडचा नफ्यावर आधी हक्क पोंचतो. वसूल मांडवलावर किमान डिव्हिडंड ६% असावें व गुंतविलेल्या मांडवलावर तें ४% असावें असें इंडस्ट्रिअल कोर्टानें १९४८ मध्यें ठरविलेलें आहे. कामगारांना सालोसाल डिव्हिडंड देत गेल्यानें डिव्हिडंड कमी कमी होत जाईल आणि शेअर होल्डर्स आपले पैसे गिरण्यांतून काढून घेऊन इतरत्र गुंतवूं लागतील. त्यामुळें फारच बिकट परिस्थिति निर्माण होईल. दिवाटिया कमिटीनें सांगितल्याप्रमाणें, यंत्रसामुग्रीचें आधुनीकरण करण्यासाठीं १० वर्षांत ७० कोटींचा फंड पाहिजे, तो उभा करणेंहि अवघड होईल. बोनस ही नफ्यांतून द्यावयाची देणगी आहे, कामगारांना हक्कानें बोनस मागता येणार नाहीं. ठरविलेली मजुरी कामगारांना अपुरी व अयोग्य वाटत असेल तर ती वाढवून घेण्यासाठीं कामगार संघाला इतर कायदेशीर मार्ग आहेत; बोनस वाढवून अप्रत्यक्ष रीतीनें मजुरी वाढविता येणार नाहीं.":—सर जमशेटजी कांगा ह्यांचा गिरणी मालक संघाचे वतीनें लेबर अपेलेट ट्रायब्यूनलसमोर युक्तिवाद.

---

### एस. व्ही. सोवनी ह्यांच्या सायन्स उपकरणांचा सचित्र कॅटलॉग

श्री. एस. व्ही. सोवनी, बी. एससी., गिरगांव रोड, मुंबई हे गेलीं तीस वर्षे शास्त्रीय उपकरणांचें उत्पादन करीत आहेत आणि त्यांच्या उपकरणांचा दर्जा उत्कृष्ट असल्याबद्दल त्यांची प्रसिद्धी आहे. एस. एस. सी. परीक्षेस लागणाऱ्या सायन्स ॲपरेटसची यादी त्यांनीं आतां तपशीलवार व आकृतींसह प्रसिद्ध केली आहे. फिजिऑलॉजी, हायजीन, फिजिक्स, हैड्रोस्टॅटिक्स, मेकॅनिक्स, इलेक्ट्रिसिटी, केमिस्ट्री, प्रॅक्टिकल्स, इत्यादींस लागणारी साधनें त्यांनीं वेगवेगळीं देऊन त्यांच्या किंमतीहि दिल्या आहेत. ह्या कॅटलॉगवरून सोवनी फर्मच्या व्यापाची व बजावीत असलेल्या शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसाराच्या कामगिरीची उत्कृष्ट कल्पना येते. हितसंबंधीयांस प्रस्तुत कॅटलॉग उपयुक्त वाटेल.

---

### मद्रासकडून भारताला इंजिनिअर्सचा पुरवठा

भारत सरकार आणि कित्येक राज्य सरकारें ह्यांचेकडून मद्रास सरकारकडे तेथील इंजिनेअरांसाठीं मागणी करण्यांत आली आहे. उदाहरणार्थ, मुंबई सरकारला मद्रास सरकारकडून इलेक्ट्रिक ग्रिडसाठीं असिस्टंट इंजिनिअर हवा आहे. मद्रास सरकारनें श्री. के. स. रामू ह्यांना पाठविण्याचें ठरविलें आहे. मध्यवर्ती सरकारलाहि सात मद्रासी इंजिनिअर्स देण्यांत आले आहेत. "आपल्याला जरूर पडली म्हणजे मध्यवर्ती सरकार इंजिनिअर्स देतें का?" ह्या प्रश्नास मद्रासच्या पब्लिक वर्क्स खात्याच्या मंत्र्यांनीं पुढीलप्रमाणें उत्तर दिलें:—"मध्यवर्ती सरकारास आपल्या इंजिनिअर्सची गरज भासते; त्यांच्याकडून मद्रासनें इंजिनिअर्स कधींच मागितले नाहींत."

---

### तेल कंपनीचें इराण सरकारला कर्ज

अँग्लो-इराणिअन ऑईल कंपनीनें इराण सरकारला ८० लक्ष पौंडांचें कर्ज दिलें आहे. कंपनी त्यावर व्याज घेणार नाहीं. कंपनीनें इराण सरकारला तेलाबाबत जी रक्कम द्यावी लागते, तिचे पोटीं ही रक्कम वळती केली जाईल. तेलाच्या कंपनीनें इराण सरकारला कर्ज देण्यांतील अर्थकारण स्पष्ट आहे.

### कोयना योजनेस ९० कोटी रुपये लागणार

सुमारें एक वर्षाच्या चौकशीअंतीं, कोयना धरण योजनेच्या खर्चाचा अंदाज तयार करण्यांत आला आहे. योजनेचे दोन भाग आहेत: (१) विजेचें उत्पादन, व (२) शेतीस कालव्यांतून पाणी पुरवठा. ह्यांपैकीं पहिल्या भागास ६० कोटी रुपये व दुसऱ्या भागास ३० कोटी रु. खर्च येईल, असा अंदाज आहे. सबंध योजना पुरी झाली, तर ३ लक्ष किलोवॅट वीज निर्माण होऊं शकेल. टाटांच्या सर्व वीज–केंद्रांच्या उत्पादनापेक्षा हें उत्पादन अधिक भरेल. कालव्यांखाली ४ लक्ष एकर जमीन येऊन त्यांतील पिकांची किंमत २५ कोटी रु. भरेल. शेतकऱ्यांची स्थिति सुधारल्यामुळें सरकारचेंहि उत्पन्न वाढेल. वीज योजनेवर १० वर्षांनीं ४ ते ५ % व्याज सुटण्याचा संभव आहे. योजना हातीं घेऊन ती पुरी केली तरच अर्थात हें चित्र प्रत्यक्षांत उतरेल, हें उघड आहे.

---

### वीज मिळण्याची वाट पाहून आतां स्वतःच वीज करणार

जोग विद्युत्केंद्राकडून वीज मिळण्याची शक्यता कानडा जिल्ह्यास आतां फारशी वाटत नाहीं आणि काळी नदीची योजना हातीं घेतली जाण्याचा संभव कमी झाला आहे. तेव्हां, आणखी थांबण्यापेक्षा वीज–पुरवठ्याच्या स्वतःच्या कंपन्या स्थापण्याचें शिरशी व कारवार येथील लोकांनीं ठरवून त्याप्रमाणें कामास प्रारंभ केला आहे. पॉवर हाउसची तयारी सुरू आहे.

---

### अमेरिका रशिया तेढ जपानच्या पथ्यावर पडली

अतिपूर्वेकडील तेढीच्या परिस्थितीमुळें जपानची स्थिति बरीच सावरली जात आहे. युद्धांत पराभूत झालेल्या जपानची परिस्थाति अत्यंत विकट झाली होती, परंतु आतां जपान्यांच्या चिवटपणास अमेरिकेचें आर्थिक सहाय्य मिळत असल्यामुळें जपानच्या पुनर्घटनेस इतरत्र तोड सांपडणार नाहीं, इतकी त्या देशानें सत्वर प्रगति केली आहे.

---

### प्रचारासाठीं अर्धनग्न मुलींच्या चित्रांचा उपयोग

ब्रिटिश खलाशांच्या जवळ "सोव्हिएट ललना" नांवाचीं राशियन पुस्तकें आढळलीं, त्यांत अर्धनग्न मुलींचीं चित्रें राशियन प्रचाराच्या मजकुरांत पेरलेलीं होतीं. रशियन प्रचारात्मक पुस्तकें खलाशांच्या हातीं कशीं पडलीं ह्याविषयीं ब्रिटिश नाविक खातें कसून चौकशी करीत आहे.

---

**एअर इंडिया इंटर नॅशनल लि.**—ह्या कंपनीजवळ चार विमानें आहेत आणि त्यांनीं १९४९ मध्यें मुंबई–लंडन अशा १२३ खेपा केल्या. सध्या मुंबई–लंडन आठवड्यांतून तीन खेपा चालू आहेत. मुंबई–कराची–एडन–नैरोबी प्रवास आठवड्यांतून एकदा करण्यांत येतो. अहवालाचे वर्षी कंपनीस भाड्याचें १,३५,८४,२६६ रु. मिळाले. एका विमान विक्रींत ८,५९,०२५ रु. नफा झाला, तो हिशेबांत घेऊनहि निवळ नफा ९,२८,५३१ रु. उरला. प्राथमिक खर्च, शेअरब्रोकरेज, डिबेंचर काढण्याचा खर्च, २ लक्ष रु. रिझर्व्ह फंड, इत्यादि तरतुदी करून ५८,०११ रु. निव्वळ नफा ताळेबंदांत दिसत आहे.


**पुणें जिल्हा सहकारी खरेदी–विक्री संघ लिमिटेड.**
४१२ शनवार पेठ, पुणें. २
फक्त–सभासदांकरितां.

**नोटीस**

संस्थेची वार्षिक साधारण सभा दि. २७ सप्टेंबर १९५० रोजीं दुपारीं ३ वाजतां पुणें सेंट्रल को–ऑप. बँकेच्या हॉलमध्यें होईल. सदर सभेंत १९४९–५० अखेरचा अहवाल, ताळेबंद, नफा वांटणी, डिव्हिडंड मंजूर करणें, स्थानिक हिशेब तपासनीस व स्पेशल ऑडिटर साहेब (को. सो.) यांच्या तपासणी यादीची नोंद घेणें, पोटनियम दुरुस्त्यांचा विचार करणें, का. मंडळ व स्था. हिशेबतपासनीस यांच्या निवडणुकीचा निकाल जाहीर करणें, मॅनेजर यांचे संस्थेकडील नोकरीच्या मुदतवाढीस मान्यता देणें, नवीन सभासदत्वासंबंधीच्या धोरणाचा विचार करणें, तसेंच का. मंडळाच्या घटनेसंबंधीं मे. रजिस्ट्रारसाहेब यांचेशी झालेल्या वाटाघाटीच्या वृत्तान्ताची नोंद घेणें, ऐनवेळीं येणाऱ्या विषयांचा विचार करणें, वगैरे कामें होतील. मा. का. मंडळ, स्था. हिशेबतपासनीस यांचे निवडणुकीसाठीं होणारें मतदान याच दिवशीं सकाळीं ८–३० ते १२–३० पर्यंत ४१२, शनवार पेठ, पुणें २ येथें होईल. सर्व सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंती आहे.

पुणें, दि. ९ सप्टेंबर १९५० — मे. कार्यकारी मंडळाच्या हुकुमावरून, ना. द. कुलकर्णी, मॅनेजर

**सटाणा को-ऑपरेटिव्ह परचेस सेल युनिअन लि.**
ऑफिस सटाणा, तालुका बागलाण, जि. नाशिक.

**नोटीस**

युनिअनची वार्षिक साधारण सभा शनिवार तारीख ३०–९–१९५० रोजीं दुपारीं ३ वाजतां आफिसांत पोटनियम नंबर २१ प्रमाणें विषयांचा विचार करण्यासाठीं भरणार आहे. तरी सर्व वैयक्तिक व सोसायट्यांचे प्रतिनिधींनीं हजर राहावें ही विनंति.

दगाजी अजबा पाटील,
मॅनेजिंग डायरेक्टर,
सटाणा को-ऑपरेटिव्ह परचेस सेल युनिअन लिमिटेड.

**व्यापार–उद्योग** (वर्ष ४ थें)

व्यापार, उद्योग, शेती, सहकार, विमा, बँका, आर्थिक प्रश्न इ. ची माहिती देणारें मराठींतील प्रमुख मासिक.
वार्षिक वर्गणी रु. ६, नमुना अंकाकरितां ९ आण्याचीं तिकिटें पाठवा.

**दिवाळी अंक-बँक-विशेषांक**
(पानें १५० किं. २ रु.)

वर्गणीदारांना नेहमीच्याच वर्गणींत मिळेल. आजच वर्गणीदार व्हा. बृहन्महाराष्ट्राकरितां जाहिरातीचें उत्कृष्ट माध्यम. अधिक माहितीकरितां:—

**मोहाडीकर बंधू, व्यवस्थापक,**
१० गंगानिवास, रानडे रोड, दादर, मुंबई १४.

## भारताचा परराष्ट्रीय व्यापार

### १९४९–५० मधील सुधारणा

### कापूस व चहा यांच्या निर्यातींत वाढ

भारताच्या या वर्षाच्या निर्यातींत मागील वर्षांतल्या निर्यातीपेक्षा ४९·८१ कोटी रु. ची वाढ झाली आहे. निर्यातींतील या वाढीस विशेषत: कापूस व कापसाचा माल, चहा, मसाले, कातडीं व बियाणीं या वस्तू कारणभूत झाल्या. कापूस व कापसाचा माल यांची १९४८–४९ मधील निर्यात ६२·३९ कोटी रु. ची होती ती समालोचनाच्या वर्षांत ९२·८६ रु. पर्यंत वाढली. १९४९–५० मध्यें चहाची निर्यात ७२·५३ कोटी रु. ची झाली. मागील वर्षीतील हाच आंकडा ६४·२२ कोटी रु. होता. तथापि कच्चा ताग व तागाचा माल या भारताच्या परकी हुंडणावळी मिळवून देणाऱ्या मुख्य वस्तूंची किंमत मात्र फारच घटली आहे. सद्रहू निर्यात १९४८–४९ मध्यें १७२·२१ कोटी रु. होती, ती १९४९–५० मध्यें १४३·१९ कोटी रु. झाली.

निर्यातींतील कांहीं प्रमुख वस्तूंच्या निर्यात किंमती पुढीलप्रमाणें आहेत—:

आंकडे कोटी रु. चे आहेत.

| | |
|---|---|
| कच्चा ताग व तागाचा माल | १४३·१९ |
| कापूस व कापसाचा माल | ९२·८६ |
| चहा | ७२·५३ |
| मसाले | १९·१५ |
| कातडीं | १८.५४ |
| बियाणीं | १४·९७ |
| तंबाखू | १४.५७ |
| तेलें | १२·८३ |

### व्यापाराची दिशा

भारतास जास्तींत जास्त मालाचा पुरवठा करणारें आणि भारतीय मालाचें सर्वांत मोठें गिऱ्हाइक राष्ट्र म्हणून ग्रेट ब्रिटननें आपलें प्रमुखपद कायम ठेविलें होतें. त्याच्या खालोखाल अमेरिका व पाकिस्तान यांचे क्रमांक होते. याबाबतचे आंकडे पुढीलप्रमाणें आहेत:—

| | भारतांत झालेली आयात | | भारतांतून झालेली निर्यात | |
|---|---|---|---|---|
| | १९४८–४९ | १९४९–५० | १९४८–४९ | १९४९–५० |
| (आंकडे कोटी रुपयांचे आहेत) | | | | |
| ग्रेट ब्रिटन | १५२·३६ | १४९·३२ | ९७·७० | १११·२४ |
| अमेरिका | १०६·३६ | ८७ ९१ | ७०·०७ | ७७·६० |
| पाकिस्तान | १०७·३७ | ४३·९३ | ७४·७० | ३९·७६ |

सद्रहू तक्त्यावरून १९४९–५० सालीं भारतांतून ग्रेट ब्रिटनमध्यें झालेली निर्यात १९४८–४९ सालांतल्या पेक्षां १३·५४ कोटी रु. नीं जास्त आहे. पाकिस्तानांतून होणारी आयात ६८ कोटी रु. नीं घटली आणि त्या देशास होणारी निर्यात सुमारें ३४ कोटी रु. नीं कमी झाली. १९४९–५० मध्यें पाकिस्तानकडे सुख्कीच्या मार्गानें २५·५८३ कोटी रु. ची आणि समुद्रमार्गें १३·९३ कोटी रु. ची निर्यात झाली.

पुढील महत्त्वाच्या देशांशीं भारताचा आयात व्यापार चालतो. इजिप्त ( ३९·४६ कोटी रुपये ), इराण ( ३२·५० कोटी रु. ), ऑस्ट्रेलिया ( ३३·९८ कोटी रुपये ), जपान ( २१.४१ कोटी रु. ), आणि केनिया वसाहत ( १५·०४ कोटी रुपये ). या देशांतून भारतांत होणाऱ्या आयातींत मागील वर्षांतल्यापेक्षां १९४९–५० मध्यें वाढ झाली आहे.

१९४९–५० मधील भारताच्या परराष्ट्रीय निर्यात व्यापारांत ग्रेट ब्रिटन, अमेरिका व पाकिस्तान यांव्यतिरिक्त ऑस्ट्रेलिया ( २५·९८ कोटी रुपये ), सीलोन ( १५·६२ कोटी रुपये ), ब्रम्हदेश ( १३·५१ कोटी रुपये ), हाँगकाँग ( १३·३१ कोटी रुपये ), आणि कॅनडा ( १०·८३ कोटी रुपये ) वगैरे देशांचा समावेश आहे.

**वाळवंटाला पाणी-पुरवठा**—अरबस्तानच्या वाळवंटांत एक मोठें धरण बांधण्याची योजना कांहीं अमेरिकन इंजिनिअरिंग कंपन्या विचारांत घेत आहेत. सध्यां ही योजना स्वप्नसृष्टींतच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु पुढेंमागें ती फलद्रूप झाल्यास तैग्रीस व युफ्राटिसच्या खोऱ्यातील वाळवंटांतून धान्य पिकूं शकेल. १ कोटी टन धान्य पिकवून ४ कोटी लोक जगूं शकतील असा अंदाज करण्यांत आला आहे.

**इंडियन बँकस ॲन्युअल**—मद्रास येथील इंडियन प्रेस पब्लिकेशन्स ह्यांनीं १९५० चें इंडियन बँकर्स ॲन्युअल प्रकाशित केलें आहे. पुस्तकाची किंमत १० रु. असून त्यांत रिझर्व्ह बँक ॲक्ट, निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट, इत्यादींसंबंधीं प्रकरणें आहेत. त्याशिवाय आंतरराष्ट्रीय बँकिंग आणि भारतीय बँकिंग ह्यांचे संबंध दर्शविणारेंही एक उद्बोधक प्रकरण त्यांत आहे


# बँक ऑफ पूना, लिमिटेड.

(शेड्यूल्ड बँक)

अधिकृत भांडवल रु. ५०,००,०००
विक्रीस काढलेलें व खपलेलें रु. २५,००,०००
वसूल भांडवल रु. १२,५०,०००

— संचालक मंडळ —

१ श्री. मुरलीधर चतुरभुज लोया, ( चेअरमन )
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी., व्हा. चेअरमन
३ डॉ. ना. भि. परुळेकर, संचालक 'सकाळ'
४ श्री. फ्रामजी पेस्तनजी पोचा, सीड्स मर्चंट
५ श्री. लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी, बँकर्स व मर्चंट सोलापूर
६ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी, व्यापारी
७ श्री. गणपतराव काळूराम नाईक, बी. एस्सी., बी. ई. एलएल., बी.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत मौल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याची सोय.

ठेवींवर व्याज—
चालू खातें अर्धा टक्का, सेव्हिंग्ज १॥ टक्के,
मुदत ठेव १ वर्ष २॥ टक्के, ३ वर्षें ३ टक्के.

शाखा स्थानिक–(१) भवानी पेठ, व (२) सदाशिव पेठ, पुणें.
बाहेरगांवीं—सोलापूर, सांगली.
मुख्य ऑफिस:–४५५ रविवार पेठ, पुणें नं. २

गो. गं. साठे.
मॅनेजर.

## इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाचें कार्य

दुसऱ्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या अनेक दुय्यम संस्था आहेत. त्यांपैकीं इंटर नॅशनल मॉनेटरी फंड ही एक महत्त्वाची संस्था आहे. ह्या संस्थेची मुख्य कचेरी १८१८ एच. स्ट्रीट वॉशिंग्टन २५. डी. सी. येथें आहे. आतापर्यंत संस्थेचे सभासदत्व ४८ राष्ट्रांनीं स्वीकारलेलें आहे. संस्थेची स्थापना २५ डिसेंबर १९४५ रोजीं झाली आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या जनरल असेंब्लीनें तिला १५ नोव्हेंबर १९४७ रोजीं मान्यता दिली.

संस्थेच्या उद्दिष्टांत पुढील कांहीं हेतूंचा समावेश करण्यांत आला आहे. (१) आंतरराष्ट्रीय चलनांच्या व्यवहाराबद्दल एकमेकांशी सहकार्य करणें, व त्यासाठी जरूर तो विचारविनिमय आणि सल्लामसलत देणें घेणें (२) आंतरराष्ट्रीय व्यापाराची वाढ करून त्यांत समतोलपणा राखण्यासाठी मदत करणें. ह्या उपायानें रोजगारीची वाढ करून सभासद राष्ट्रांचा आर्थिक विकास घडवून आणणें (३) हुंडणावळींच्या दरांत स्थैर्य राखणें आणि केवळ स्पर्धेसाठी करण्यांत येणाऱ्या हुंडणावळीच्या किंमतीची घट करून देणें (४) आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याच्या व्यवहारांत जे चढउतार होतात त्यांचा कालावधि कमी करणें आणि त्यांची तीव्रता कमी करणें.

फंडाची व्यवस्था बोर्ड ऑफ गव्हर्नर्स आणि एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर्स पहातात. सर्व अधिकार बोर्डाच्या स्वाधीन असून त्याची बैठक वर्षांतून एकदा होते. प्रत्यक्ष व्यवहारांत सर्व अधिकार डायरेक्टर्स वापरतात आणि ते बोर्डाला जबाबदार असतात. डिसेंबर १८, १९४६ रोजीं फंडानें आपल्या ३२ सभासद राष्ट्रांच्या चलनांच्या अधिकृत सम किंमती प्रसिद्ध केल्या, व १ मार्च १९४७ पासून फंडाच्या कामाला प्रारंभ झाला. नंतर दर महिन्याला चलनाच्या किंमतींचें कोष्टक प्रसिद्ध करण्यांत येऊं लागलें. सभासद राष्ट्रांकडून त्यांचें चलन अगर सोनें घेऊन त्याच्या बदली त्यांना पाहिजे असलेली परदेशीय हुंडणावळ फंडाकडून विकत मिळते. फंडाचें कार्य इंटर नॅशनल बँकेशी पूर्णपणें सहकार्य करून चालतें.

---

## साखर कारखान्यांतील तंटा इंडस्ट्रिअल कोर्टाकडे सोंपविला

खालील साखर कारखाने व त्यांतील कामगार ह्यांचेमधील औद्योगिक तंटे निवाड्यासाठी मुंबई सरकारनें इंडस्ट्रियल कोर्टाकडे सोपविले आहेत.

१ बेलापूर शुगर कंपनी, हरिगांव
२ महाराष्ट्र शुगर मिल्स, टिळकनगर
३ गोदावरी शुगर मिल्स; लक्ष्मीवाडी
४ गोदावरी शुगर मिल्स, साखरवाडी
५ बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, बोरगांव
६ श्रीचांगदेव शुगर मिल्स, चांगदेवनगर
७ फलटण शुगर वर्क्स, साखरवाडी


---

## पुणें जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.

१,१३,६८० रु. चे कर्जमागणीचे २३ अर्ज ह्या वर्षी बँकेकडे आले. ३ नवीन कर्जें १९,००० रु. ची वाटण्यांत आलीं. सरकारकडून मिळालेली ग्रँट जमेस धरून ६३१ रु. नफा झाला. डिव्हिडंड १½% देण्यांत येणार आहे. (चेअरमन: दा. वा. पोतदार. मॅनेजर: भ. ग. सावणे.)


बेडेकर पापड

मशिन्स् रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.



पेडणेकर आणि कं. लिमिटेड
शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२, गिरगांव रोड, मुंबई नं. ४.
फोन नं.–२१७३८



अनुभवी मातांना हें ठाऊक आहे...
कीं तान्ह्या मुलांचा साधा अगर डांग्या खोकला "हूपसॅक" नियमितपणें दिल्यानें थोड्या दिवसांत साफ बरा होतो.
त्यांच्या संग्रहीं "हूपसॅक" असतेंच.
हूपसॅक
शाहू आयौषधि कारखाना लि., कोल्हापूर
B.C. PUBLICITY
S.A.K. LTD. M.

## कूळ व शेतजमीन कायदा

आवृत्ती दुसरी प्रसिद्ध झाली. किं. ४ रु. कूळकायदा (१९३९) आवृत्ति ३ री किं. ३ रु., तुकडेबंदी व जमीन एकत्रीकरण कायदा किं २ रु. भाडेनियंत्रण कायदा किंमत २ रु., शेतकरी कर्जनिवारण कायदा किं. ४॥ रु., मुंबई सावकारी कायदा किं. २॥ रु., द्विभार्या–प्रतिबंधक कायदा (आवृत्ति ३ री) किंमत १ रु., हिंदु घटस्फोट कायदा किं. १ रु., खंडपावत्यांचें पुस्तक ८ आणे.

पत्ता:–लॉ अॅकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २


हें पत्र पुणें, पेट भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.